पुरोगामी विचाराचे
एकमत

page- 3
01 Oct 2024

## फास्ट न्यूज

# सायबर कीर्तन व सायबर पोस्टर प्रझेंटेशला प्रतिसाद

लातूर : येथील राजर्षी शाहू महाविद्यालयने विवक हिल फाउंडेशन, पुणे यांच्या सोबत सामंजस्य करार करुन सायबर शिक्षा सायबर सुरक्षा या उपक्रमात मागील दोन वर्षापासून कार्य करत आहे . या उपक्रमाअंतर्गत यावर्षी लातूर जिल्ह्यातील शाळा, महाविद्यालये, शासकीय कार्यालय, सामाजिक संस्था व अशा अनेक ठिकाणी माहिती तंत्रज्ञान विभागातील बीसीए व बी .एस्सी .सी .एस च्या सायबर वॉरिअर्सनी सायबर अवेरनेस कार्यक्रम घेऊन ६० हजारपेक्षा जास्त विद्यार्थ्यांना व इतर लोकांना मार्गदर्शन केले आहे . याचाच भाग म्हणून दि . २७ सप्टेंबर रोजी महाविद्यालयात या सायबर वॉरिअर्सनी सायबर कीर्तन व सायबर प्रझेंन्टेशनचे आयोजन केले होते . त्यास उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला.